नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/१०/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## पो.स्टे. एमआयडीसी बोरी परिसरातील देहव्यापार अडडयावर धाड

दिनांक १८/१०/२०२४ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर विभाग कार्यालयाचे पथकाने सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. दीपक अग्रवाल (I.P.S) यांच्या आदेशाने पो. स्टे. एमआयडीसी बोरी परिसरात हॉटेल सातबारा येथे देह व्यवसाय होत असल्याची माहिती मिळाल्याने हॉटेल सातबारा येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथील पथक व पो.स्टे. बुटटीबोरी येथील पो. स्टॉफच्या मदतीने देह व्यवसाय बाबत हॉटेल सातबारा येथे रेड केली असता हॉटेल सातबाराच्या पहिल्या माळावरील रूम नं. १०२ मध्ये हॉटेल मालक गणेश लक्ष्मण वैदय रा. प्रभाग क्रमांक ७ बुटटीबोरी व मॅनेजर सुमित बेनीशंकर भुरिया रा. छप्परा जिल्हा शिवनी ह.मु. टाकळघाट यांनी स्वत:च्या व मालक गणेश वैदय यांच्या आर्थिक फायदयाकरीता संगणमत करून सुटका केलेली पिडीत महिला हिला अधिक पैशाचे आमिश दाखवुन बाहेरून बोलावुन घेतले व देहव्यापार करण्यास प्रवृत्त केले तसेच आरोपीतांनी ग्राहकास हॉटेल सातबारा इन मधिल रूम नं. १०२ मध्ये देह व्यापारास जागा उपलब्ध करून देवुन पिडीत महिलेला ग्राहकास पुरवुन कुंटनखाना चालवितांना आढळुन आले. यातील नमुद आरोपी हॉटेल मालक गणेश लक्ष्मण वैदय रा. प्रभाग क्रमांक ७, बुटटीबोरी व मॅनेजर सुमित बेनीशंकर भुरिया रा. छप्परा जिल्हा शिवनी ह.मु. टाकळघाट यांच्यावर एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे अपराध कमांक ४५१/२४ कलम १४३(१)(फ), १४३(२), ३(५) भारतीय न्याय सहिता तसेच कलम ३,४,५ स्त्रिया व मुली अनैतीक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले.

सदर कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा. मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. दीपक अग्रवाल (ण्च्ै) यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथील पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, मपोउपनि जोत्सना गिरी हे होते. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय येथील पो.ना. रोशन बावने, पो.स्टे. बुटटीबोरी येथील पो.हवा. अरून कावळे व पो.शि. रमेश नागरे पो. हवा. किशारे सरमाखे, चापोशि प्रविण खोडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# खुन करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :– फिर्यादी नामे– जगदीश भगवान सावजी, वय ५३ वर्ष, रा. वार्ड क्र. १७, पहलेपार सावनेर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ६८६/२२ कलम ३०२, ३४ भांदवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. ०६/०९/२०२२ रोजी रात्री २२.०० वाजता दरम्यान फिर्यादी यांचा भाचा व ईतर दोन इसम बोलत असतांना आरोपी क. ०१ नामे– अशोक किशन नुसाते, वय ४२ वर्ष, २) अतुल गेंदलाल नुसाते, वय २१ वर्ष दोन्ही रा. वार्ड नं. १६ झेंडा चौक पहलेपार सावनेर हे तिथून जात असता त्यांना मृतक नामे–नरसिंग उर्फ भुरू महादेव पहाडे, वय ३४ वर्ष, वार्ड नं. १६ झेंडा चौक पहलेपार सावनेर हा टोमणे मारत असल्याचे आरोपीतांना वाटल्याने त्यांने मृतकास तुम्ही मला पाहून टोमणे मारता काय ? थांब तुझे कडे पाहतो असे म्हणून यातील आरोपींनी घरी धावत जावुन गुप्ती सारखे हत्यार आणले आणि मृतकाला मारू लागले त्यांनी मृतकाच्या डोक्यावर, मानेवर गुप्ती सारखे हत्यारानें वार करून जिवाने ठार मारले आहे अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि निशांत फुलेकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. एडीजे ०५ श्रीमती कनकदंडे मॅडम यांनी एकुण १४ साक्षीदार तपासुन आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी मा. एडीजे ०५ श्रीमती कनकदंडे मॅडम यांनी वरील नमुद आरोपी क्र. ०१ याने कलम ३०२ भांदवि मध्ये आजीवन कारावास व ५०००रू दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास तसेच आरोपी क्र. ०२ यास संशयाचा फायदा देवुन निर्दोष मुक्त केले.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा मधुकर आदमने पोस्टे सावनेर यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**